आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२८ ऑगस्ट २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जपान दौऱ्यावर जाणार

- प्रधानमंत्री जन धन योजनेला आज ११ वर्षे पूर्ण

- कच्च्या कापसावरच्या आयातशुल्कातल्या  सवलतीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

- पालघर जिल्ह्यात विरार इथं इमारत दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १७ वर, राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबांना  ५ लाखांची मदत

**आणि**

- ग्रँडमास्टर प्रज्ञानंदाचा ग्रँड चेस टूर फायनल्समध्ये प्रवेश निश्चित

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी जपानला रवाना होणार आहे. १५ व्या भारत जपान वार्षिक शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासोबतची ही त्यांची शिखर परिषद आहे. संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार, तंत्रज्ञान, आणि नवोन्मेष यावर या बैठकीत चर्चा होईल, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, प्रधानमंत्री मोदी चीनचे ऱाष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या आमंत्रणावरून ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनला जातील. शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री शिखर परिषदेत सहभागी होणाऱ्या अनेक नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फिनलँडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्याशी काल दूरध्वनीद्वारे संवाद साधला. व्यापार, तंत्रज्ञान या क्षेत्रात सहकार्य

करण्यावर यावेळी दोन्ही नेत्यांमधे सहमती झाली. तसंच युक्रेनमधे सुरू असलेला संघर्ष थांबवण्याबाबतही त्यांनी चर्चा केल्याचं प्रधानंत्र्यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं.

<><><><>

प्रधानमंत्री जन धन योजनेला आज ११ वर्षे पूर्ण होत आहेत. १५ ऑगस्ट २०१४ ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाची सुरूवात केली होती. देशातल्या सर्व कुटुंबांना बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठीची ही सर्वसमावेशक योजना आहे. या योजनेअंतर्गत ५६ कोटींहून अधिक खाती उघडण्यात आली असून, बँकिंग सेवा देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत.

<><><><>

केंद्र सरकारनं कच्च्या कापसावरच्या आयातशुल्कातल्या सवलतीला येत्या ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. देशातल्या वस्त्रोद्योग क्षेत्राला पुरेशा प्रमाणात कापूस उपलब्ध व्हावा, यादृष्टीनं हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ही मुदत ३० सप्टेंबरपर्यंत होती.

<><><><>

स्वदेशी ही भारताची खरी शक्ती असून देशाला पुढे नेण्यासाठी आपल्याला स्वदेशीचा स्वीकार करावा लागेल, असं केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. एक्स या समाज माध्यमावर स्वदेशी अपनाओ' मोहिमेबद्दल केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, स्वदेशी हे फक्त एक कापड किंवा वस्तू नसून तो देशातल्या शेतकऱ्यांच्या कठोर परिश्रमाचा आदर, कारागिरांच्या कौशल्याची ओळख आणि आपल्या उद्योगांचा आदर आहे, असं त्यांनी म्हटलं.

<><><><>

गणेश चतुर्थीच्या सुट्टीनंतर आज मुंबई शेअर बाजार उघडताच निर्देशांकांमध्ये मोठी घसरण दिसून आली. अमेरिकेनं भारतीय वस्तूंवर आयातशुल्क लावल्यामुळे

बाजारावर परिणाम झाल्याचं चित्र आहे. बाजार उघडताच सेन्सेक्समध्ये ६२४ अंकांची तर निफ्टीमध्ये १८३ अंकांची घसरण झाली. दुपारी निर्देशांक थोडे सावरले. आज विशेषकरून माहिती तंत्रज्ञान, स्थावर मालमत्ता आणि औषधनिर्माण क्षेत्रांतले समभाग मंदीच्या प्रभावाखाली असल्याचं पाहायला मिळत आहे. मात्र ग्राहकोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रात खरेदीचं वातावरण आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३१ ऑगस्टला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२५ वा भाग असेल.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात विरार इथं इमारत दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १७ झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपये मदत देण्याची घोषणा केली आहे.

मंगळवारी रात्रीपासुन वसई-विरार महानगरपालिका, अग्निशामक दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तुकड्या ढिगाऱ्याखालून मदत आणि बचाव कार्य करत आहेत. विरार मधल्या नारंगी इथल्या रमाबाई अपार्टमेंट या चार मजली इमारतीचा मागील भाग मंगळवारी रात्री चाळीवर कोसळला. अपघातग्रस्त इमारतीमध्ये ५० सदनिका होत्या. त्यापैकी अंदाजे १२ सदनिका कोसळल्याची माहिती समोर येत आहे.

**<><><><><>**

पंजाबमधे आलेल्या पुरामुळे नागरिकांना कालची रात्र घराच्या छतावर बसून काढावी लागली. पुरात मोठ्या प्रमाणात पिकांचंही नुकसान झाल्याचं प्रशासनानं सांगितलं. होशियारपूर, जलंधर, कपूरथला, आनंदपूर साहिब, रोपर या जिल्ह्यांना पुराचा फटका बसला आहे. देशाच्या सीमेवरले सीमा सुरक्षा दलाचे अनेक तपासणी

नाके ही पुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत. गरजू लोकांना आवश्यक मदत तात्काळ पोहोचवण्याची सूचना पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी दिल्या आहेत.

**<><><><>**

उत्तराखंडमधील हल्द्वानी इथं जयपूर बिसा गावात आज सकाळी एक खाजगी शाळेची बस चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे ती रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात उलटली. यानंतर, स्थानिक लोकांनी तात्काळ मदत करत बसच्या काचा फोडून बसमधल्या सर्व मुलांना बाहेर काढलं. या अपघातात १२ हून अधिक मुलं जखमी झाली असून बस चालक आणि कंडक्टरलाही गंभीर दुखापत झाली आहे. जखमींना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><>**

जम्मू- काश्मीरमध्ये जम्मू- श्रीनगर महामार्ग आज सलग तिसऱ्या दिवशीही वाहतुकीसाठी बंद राहिला. या भागात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भूस्खलन झालं असून त्यामुळे सुमारे ६०० वाहनं विविध ठिकाणी अडकून पडली आहेत. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशननं महामार्ग मोकळा करण्याचं काम युद्धपातळीवर हाती घेतलं आहे. किश्तवाड- सिंथन- अनंतनाग महामार्ग देखील वाहतूकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये वैष्णोदेवी मंदिर मार्गावर कटरा परिसरात भूस्खलनात मरण पावलेल्यांच्या कुटुंबाला पाच लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये नुकसानभरपाई जाहीर करण्यात आली आहे. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी काल कटरा रुग्णालयात जखमींशी संवाद साधल्यानंतर ही घोषणा केली. या दुर्घटनेत जवळपास ३० जणांचा मृत्यू झाला असून, मदत आणि बचावकार्य काल सायंकाळपर्यंत सुरू होतं.

**<><><><>**

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणानं देशभरातल्या शाळांना पाच ते १५ वर्षे वयोगटातल्या मुलांसाठी आधार अनिवार्य बायोमेट्रिक माहिती वेळेत ताजी करण्यास सांगितलं आहे. प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश कुमार यांनी यासंदर्भात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून या माहिती संकलनासाठी शिबिरं आयोजित करण्याची विनंती केली. प्राधिकरण आणि शालेय शिक्षण विभागाच्या या संयुक्त उपक्रमाद्वारे देशभरातल्या १७ कोटी बालकांची बायोमेट्रिक्स माहिती ताजी करणं सोपं होईल अशी अपेक्षा आहे.

**<><><><><>**

दीड दिवसांच्या गणपतीचं आज विसर्जन होणार आहे. मुंबई महानगरपालिकेनं यासाठी यंदा २७५ हून अधिक कृत्रिम तलाव उभारले आहेत. मुंबईकरांनी या कृत्रिम तलावात मूर्तींचं विसर्जन करावं, असं आवाहन पालिका प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. भाविकांनी घरगुती निसर्गस्नेही गणेशमूर्ती घरी बादली किंवा पिंप यामध्ये विसर्जित करावी. सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या पीओपी मूर्ती आपल्या जवळच्या कृत्रिम तलावांमध्येच विसर्जित कराव्यात, असे आवाहन उपायुक्त सपकाळे यांनी केलं आहे. मुंबईतल्या चौपाटया तसंच नैसर्गिक तलाव या ठिकाणीही पालिकेनं विसर्जनाची चोख व्यवस्था केली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत सिऍटल इथं भारतीय वाणिज्य दूतावास कार्यालयाच्या नव्या इमारतीचं उद्घाटन काल भारताचे राजदूच विनय क्वात्रा यांनी केलं. या दूतावासाचं तात्पुरतं काम २०२३ला सुरू झालं होतं. तर जुलै २०२४ मधे दूतावासाची पूर्णवेळ सेवा सुरू झाली. आतापर्यंत या दूतावासाने २३ हजार ७२२ अर्जदारांना सेवा दिली आहे. उद्घाटनच्या कार्यक्रमाला वॉशिंग्टनचे गव्हर्नर बॉव फर्ग्युसन यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

इस्त्रायल गाजा शहर आणि उत्तर गाजा पट्टीवर  लष्करी हल्ले  करणार असून त्यामुळे या भागात राहणाऱ्या नागरिकांनी  दक्षिणेकडे स्थलांतर करावं, असं इस्त्रायलच्या  संरक्षण दलांनी म्हटलं आहे. दक्षिणेकडच्या पट्ट्यात मोठी मोकळी जागा शिल्लक असून इथं मानवतावादी दृष्टिकोनातून मदतसाहित्यही पुरवलं जात असल्याचं इस्त्रायलनं सांगितलं.

<><><><><>

भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदाने ग्रँड चेस टूर फायनल्समध्ये आपलं स्थान पक्क केलं आहे. प्रज्ञानंदाने सिंकफिल्ड कपमध्ये त्यानं उपविजेतेपद मिळवलं आहे. अमेरिकेच्या वेस्ली सोने या स्पर्धेचं विजेतेपद जिंकले आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत, पुरुष एकेरीत नोवाक जोकोविचने अमेरिकेच्या झॅकारी स्वाज्दा याच्यावर ६-३, ६-३, ६-१ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. तसंच स्पेनच्या कार्लोस अल्काराझने इटलीच्या मॅटिया बेलुचीवर ६-१, ६-०, ६-३ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. महिला एकेरीत, जपानच्या नाओमी ओसाकाने बेल्जियमच्या ग्रीट मिनेनवर सरळ सेटमध्ये ६-३, ६-४ असा विजय मिळवत पुढच्या फेरीत प्रवेश केला. तसंच अन्य एका सामन्यात मीरा अँड्रीवा ने अनास्तासिया पोटापोवाचा सरळ सेटमध्ये पराभव केला.

<><><><><>

पॅरिसमध्ये सुरु बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी आणि ऑलिंपिक पदक विजेती पीव्ही सिंधू यांनी काल अंतिम १६ मध्ये स्थान मिळवलं. सात्विक आणि चिराग या भारतीय जोडीने चिनी तैपेईच्या लिऊ कुआंग हेंग आणि यांग पो हान यांचा पराभव केला. महिला एकेरीत पीव्ही सिंधूने मलेशियाच्या करुपथेवन लेत्शाना हिचा पराभव केला.

//<><><><><>//